MHOS150009762021

## नियमित दिवाणी दावा क. ४५१/२०२१

## निशाणी क. ५ वरील आदेश
**( नितीन वि. गट विकास अधिकारी व ईतर )**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ प्रमाणे प्रतिवादींविरूध्द तुर्तातुर्त ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने दाव्यातील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे केले आहे. मौजे खासगाव ता. परंडा येथील घर मिळकत क. २२६ ज्याचे क्षेत्र उत्तर दक्षिण ५० फुट व पूर्व पश्चिम ५० फुट ज्याच्या चतु:सिमा पुर्वेस रस्ता, पश्चिमेस गावठाण, दक्षिणेस महादेव लिमकर व उत्तरेस बार्शी परंडा रस्ता तसेच घर मिळकत क. २२७ ज्याचे क्षेत्र उत्तर दक्षिण ५० फुट, पूर्व पश्चिम ५० फुट ज्याच्या चतु:सिमा पुर्वेस रस्ता, पश्चिमेस गावठाण, दक्षिणेस गावठाण व उत्तरेस नितीन लिमकर (सदर मिळकतींना यापुढे सोईसाठी दावा मिळकती असे संबोधण्यात येईल.)

३. अर्जातील कथने थोडक्यात असे आहे की, वादी हे खासगावचे कायमचे रहिवाशी आहेत. वादी क. १ हा वादी क. २ चा मुलगा आहे. तसेच प्रतिवादी क. १ हे पंचायत समिती परंडाचे गट विकास अधिकारी असुन प्रतिवादी क. २ हे खासगाव गावचे ग्रामसेवक आहेत. दावा मिळकती या मौजे खासगाव ग्रामपंचायतीच्या मालकीच्या असुन त्या खासगाव ग्रामपंचायतीच्या गावठाण पैकी मिळकत आहे. वादी व प्रतिवादी यांचे हिंदू एकत्र कुटूंब असल्याने ते दावा मिळकती एकत्रात उपभोगतात. वादी व प्रतिवादी हे गेल्या सहा वर्षापासुन दावा मिळकतीवर वास्तव्य करीत असुन सदरील दावा मिळकतीवर वादी यांची राहती घरे व जनावरांचे शेड, गोठे बांधलेले आहेत. वादी यांना राहण्यासाठी घर जागा

नसल्याने प्रतिवादी क्र. २ ग्रामपंचायत यांच्याकडे रितसर अर्ज देवुन गावठाणापैकी राहण्यासाठी जागेची मागणी केली. त्यांनी अर्जावर रितसर कारवाई करून दावा मिळकत ही वादीच्या ताब्यात दिली व त्याची नोंद ग्रामपंचायत दप्तरी केली. सदरील दावा मिळकतीची नोंद ग्रामपंचायत दप्तरी सन २०१५—१६ च्या असेसमेंट रजिस्टरवरती घेण्यात आली असुन सदरील मिळकतीचे घर क्र. २२६, २२७ असे आहे. वादी यांची नोंद दावा मिळकतीस भोगवटदार म्हणुन लागलेली आहे. सन २०१५—१६ च्या दरम्यान सदरील मिळकतीवर घरे बांधुन त्या ठिकाणी वादी हे कुटूंबासह राहत असुन त्यांनी दावा मिळकतीच्या काही भागावर जनावरांचे गोठे देखील बांधलेले आहेत. वादी यांचे सन २०१५—१६ सालापासुन दावा मिळकतीवर शांततामय कब्जेवहिवाट चालु असुन प्रतिवादी हे वादीकडुन ग्राम पंचायत कर घेत आहेत. वादी तो कर देत आहे. वादी यांनी महाराष्ट राज्य महावितरण कंपनी यांचेकडुन घर वापरासाठी वीज कनेक्शन घेतले असुन सदरील वीज कनेक्शनसाठी प्रतिवादी क्र. २ ग्रामपंचायत यांनी सिंगल फेजची लाईन वादीच्या दावा मिळकतीमधील घरापर्यंत आणुन दिली आहे. वादी यांना पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर झाले आहे. अशा प्रकारे दावा मिळकतीवर वादीची शांततामय कब्जेवहिवाट चालु आहे.

४. सदरील दावा मिळकतीवर वादी रहात असताना राजकिय द्वेषापोटी मंदा पाटील, राहुल गाढवे, रमेश गणगे यांनी प्रतिवादी क्र. १ कडे अर्ज देवुन स्मशानभूमी व गावठाणच्या जागेवरती केलेले अतिक्रमण काढणेबाबत व बोगस नोंदी रद्द करणेबाबत अर्ज दिला व त्या अर्जाच्या अनुशंगाने व राजकिय दबावापोटी प्रतिवादी हे वादी यांचे विरूध्द सुडबुध्दीने कारवाई करीत आहेत. प्रतिवादी वादी यांचेकडे येवुन त्यांचे रहाते घर काढुन टाकण्याची धमकी देत आहे. याचाच एक भाग म्हणुन प्रतिवादी क्र. १ यांनी दिनांक १९.०७.२०२१ रोजी प्रतिवादी क्र. २ यांना आदेश देवुन सदरील वादीच्या घर नंबर २२६ व २२७ च्या

नोंदी रद्द करून कारवाईचे आदेश दिलेले आहेत. यावरून प्रतिवादी क्र. १ यांनी वादी यांची दावा मिळकतीमधील घर काढुन टाकणेबाबत कारवाई चालु केली असुन ते वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत.

५. प्रतिवादी हे वादीवरती कारवाई करू लागल्याचे स्पष्ट होत असुन वादी यांना दुसरे राहते घर नाही. वादी यांच्या ग्रामपंचायत दप्तरी असलेल्या नोंदी रद्द करून वादी यांना घरातुन बेदखल करण्याच्या तयारीत प्रतिवादी आहेत. दिनांक २३.०७.२०२१ रोजी वादी यांनी प्रतिवादी यांना त्यांची नोंद रद्द न करण्याची तसेच त्यांचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा होईल असे कोणतेही गैरकृत्य करू नये म्हणुन विनंती केली. त्यावेळी प्रतिवादी यांनी त्यास नकार दिला व राहत्या घरातुन हाकलुन देण्याची धमकी दिली. म्हणुन वादी यांनी प्रस्तुतचा दावा निरंतर मनाईसाठी दाखल केला. वादीस सकृतदर्शनी केस आहे. न्यायाचा कल वादीचे बाजुने आहे. मुळ दाव्याच्या अंतिम निकालास वेळ लागणार असल्याने प्रतिवादी यांनी वर नमुद केले प्रमाणे कारवाई केल्यास वादीचे न भरून येणारे नुकसान होणार आहे. सबब दाव्याचा अंतिम निकाल लागे पावेतो प्रतिवादी यांनी स्वत: अगर त्यांचे नोकर, नातेवाईक वा इतरांमार्फत दावा मिळकतीमधील वादीचे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा होईल असे कोणतेही गैरकृत्य करू नये. वादीच्या दावा मिळकतीच्या नोंदी रद्द करू नये असा तुर्तातुत ताकीदीचा हुकूमनामा प्रतिवादी यांचे विरूध्द व्हावा अशी विनंती केली आहे.

६. प्रतिवादी यांना पुरेसी संधी देवुन देखील त्यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले नाही. म्हणुन अर्जाचे काम त्यांचे म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात आले. वादी यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांनी युक्तवाद केला नसल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांचे युक्तीवादाशिवाय पुढे चालविण्यात आला.

७. अर्जातील कथनांवरुन प्रस्तुत प्रकरणात खाली नमुद मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झालेले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष मी खाली नमुद कारणमिमांसेसह देत आहे.

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस वादीने सिध्द केली आहे का? | होय. |
| २. | न्यायाचा समतोल वादीचे बाजूने आहे का? | होय. |
| ३. | जर तुर्तातुर्त ताकिदीचा हुकुम केला नाही तर वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे का? | होय. |
| ४. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

८. वादीने प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ निशाणी ४ सोबत मौजे खासगाव येथील ग्रामपंचायत सन २०१५—१६ घर मिळकत क्र. २२६ व २२७ चे नमुना क्र. ८ चे उतारे, कर पावत्या, फेर आकारणी पावती याच्या छायांकित प्रती तसेच वादी क्र. १ व २ यांचे नावे असलेल्या वीज बिलाच्या पावत्या आणि पंचायत समिती कार्यालय, परंडा यांच्याकडुन जा.क्र./पंसप/पंचायत१/कावि/१०४३/२०२१ नुसारचा आदेश ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत** :—

९. मुद्दा क्र. १ ते ३ हे स्वतंत्र असले तरी देखील ते एकमेकांशी संलग्न असल्यामुळे कारणमिमांसेत येणा—या कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरचे तिन्ही मुद्दे एकत्रात विवेचनासाठी घेण्यात आले आहेत.

१०. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीमधील वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये, तसेच त्यांच्या दावा मिळकती बाबतच्या नोंदी रद्द करू नये म्हणुन निरंतरची

मनाई देण्यास दाखल केला आहे.

११. वादी यांनी त्यांचे अर्जात हे मान्य केले आहे की, दावा मिळकती या प्रतिवादी क्र. २ म्हणजेच ग्रामपंचायत यांचे मालकीची गावठाण जमीनीत आहेत. निशाणी क्र. ४ सोबतच्या घर क्र. २२६, २२७ च्या ८अ च्या उता—यावरून घर मिळकत क्र. २२६ याचे भोगवटदार महादेव लिमकर आहेत. तर घर मिळकत क्र. २२७ चे भोगवटदार नितीन लिमकर आहेत. मालकाचे नावे या रकान्यात गावठाण असे नमुद केले आहे. वादी यांनी घर पट्टी भरल्याच्या पावत्या देखील दाखल केलेल्या आहेत. त्यावरून सन २०१८ व सन २०१९ या कालावधीत वादी यांनी कर पावत्या भरल्याचे प्रथम दर्शनी दिसत आहे. अभिलेखावर दाखल केलेल्या वीज बिलावर घर क्र. २२६ व वादी क्र. १ व घर क्र. २२७ वर वादी क्र. २ चे नाव नमुद आहे. यावरून दावा मिळकतीवर आज रोजी वादी यांचा ताबा असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. परंतु वादी यांनी मान्य केल्याप्रमाणे वादी दावा मिळकतीचे मालक नाहीत. तर प्रतिवादी क्र. २ यांचे नावे गावठाण म्हणुन दावा मिळकती असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत आहे. वादी यांचे वतीने दाखल करण्यात आलेल्या पंचायत समिती कार्यालय, परंडा यांच्याकडील पत्रावर ‘‘मौजे खासगाव ता. परंडा येथील स्मशानभूमी व गावठाणच्या जागेवर बोगस नोंद ग्रामपंचायत नमुना क्र. (जुने) घर क्र. २२७ वर श्री. नितीन महादेव लिमकर व घर क्र. २२८ वर श्री. महादेव ज्योतीराम लिमकर यांची कर मर्यादित नोंद घेतल्याने नमुना क्र. ८ रजिस्टरवर आढळुन आले आहे. तरी सदर जुने गावठाणातील बोगस नोंदी नियमानुसार रद्द करण्याची कारवाई करून अहवाल सादर करावा.’’ असा आदेश प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. २ यांना दिल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे.

१२. वादी हे दावा मिळकतीचे मालक नाहीत. दावा मिळकत प्रतिवादी क्र. २ ग्रामपंचायत यांचे गावठाणातील आहे. प्रतिवादी क्र. १ हे प्रतिवादी क्र. २ चे

वरिष्ठ अधिकारी आहेत. वादी हे गेल्या सहा वर्षापासुन दावा मिळकतीमध्ये राहत असल्याचे कथन त्यांनी केले आहे. त्यांनी प्रतिवादी हे त्यांना कायदेशिर मार्गाचा अवलंब केल्याशिवाय दावा मिळकतीतुन बेदखल करत आहेत याबाबतचे कथन केलेले नाही. याउलट पंचायत समिती कार्यालय, परंडा यांच्याकडुन जा.क्र. /पंसप/पंचायत१/कावि/१०४३ /२०२१ नुसारचा आदेश यामध्ये जुने गावठाणातील बोगस नोंदी नियमानुसार रद्द करण्याची कारवाई करून अहवाल सादर करावा असा आदेश प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. २ यांना दिला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ हे नियमानुसार कायदेशिर प्रक्रियेचा अवलंब करून कार्यवाही करीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. सबब वादीस प्रथमदर्शनी केस नाही. न्यायाचा कल वादीचे बाजुने नाही. दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. २ च्या ग्रामपंचायत गावठाणातील आहे. सबब तुर्तातुर्त मनाईचा आदेश पारीत न केल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार नाही. सबब मी मुद्दा क्र. १ ते ३ बाबत माझे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत –</u>**

१३. मुद्दा क्र. १ ते ३ चे नकारार्थी निष्कर्ष विचारात घेता वादी यांचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज मंजूर होण्यास पात्र नाही. त्यास्तव मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सही/–
दिनांक ०३/०८/२०२२ ( आय. जी. महादेवकोळी )
२ रे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर परंडा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.N.Phurade |
| Name of Court | Shri. I.G.Mahadeokoli, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Paranda |
| Date of Dictation | 03/08/2022 |
| Judgment signed by the P.O. on | 03/08/2022 |
| Judgment/Order uploaded on | 03/08/2022 |